स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालय**

**नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१**

दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ-५/युएसएफबी/डी-मॅट खाते/सन २०२३ /१५६ दि.१८/०१/२०२३

**परिपत्रक**

**विषय :-** **पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि.मुंबई या बँकेमध्ये राज्यातील बिगरकृषी पतसंस्थांनी गुंतवलेल्या ठेवीच्या रकमा भागाच्या (शेअर्सच्या) स्वरूपात प्राप्त होण्यासाठी युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.,नवी दिल्ली या बँकेत डी-मॅट (D-Mat) खाते उघडणेबाबत..**

**संदर्भ :-** १) सहसचिव, वित्त मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग (बँकींग प्रभाग) नवी दिल्ली यांचेकडील दि.२५/१/२०२२ ची अधिसूचना

२) प्राधिकृत अधिकारी, युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि., नवी दिल्ली यांचेकडील दि.३०/३/२०२२ चे पत्र

वरील विषयाच्या संदर्भिय दि.२५/१/२०२२ ची अधिसूचना व दि.३०/३/२०२२ चे पत्राकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

राज्यातील ३२५ बिगरकृषी पतसंस्थांच्या रुपये पाच लाखावरील विमा सरंक्षित नसलेल्या अंदाजे रु. १५००/- कोटी रकमेच्या ठेवी पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि.मुंबई या बँकेत अडकलेल्या आहेत, असे निदर्शनास आलेले आहे.

पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि.मुंबई या बँकेचे युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.,नवी दिल्ली या बँकेत विलिनीकरण करण्यास भारतीय रिझर्व्ह बँकेने अधिसूचना क्र.सीजीडीएल-अ-२५०१२०२२-२३८९४ दि.२५/१/२०२२ नुसार केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे.सदर मान्यतेनुसार, पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि.मुंबई या बँकेचे विलीनीकरण होऊन युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.नवी दिल्ली ही बँक कार्यान्वीत झालेली आहे. त्यामुळे राज्यातील पतसंस्थांनी पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि.,मुंबई या बँकेत केलेल्या गुंतवणूकीचे दायित्व यापुढे युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि. नवी दिल्ली या बँकेचे आहे.

प्राधिकृत अधिकारी,युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.,नवी दिल्ली या बँकेचे दि.३०/३/२०२२ च्या पत्रानुसार, विलीनीकरण योजनेतील अटीनुसार संस्थात्मक ठेवीदारांचे विमा संरक्षित नसलेल्या रु.५ लाखाचे वरील एकुण ठेवीपैकी ८० % रक्कम PNCPS (Perpetual Non - Cumulative Preference Shares ) व उर्वरीत २०% रक्कम Equity Warrants (EW) मध्ये वर्गीकरण केलेनुसार भागामध्ये (शेअर्समध्ये) रुपांतरीत होणार आहेत असे नमूद केले आहे.

सदर वर्गीकरणानुसार, पतसंस्थांना ठेवीची रक्कम वरीलप्रमाणे रुपांतरीत होऊन नमुद केल्याप्रमाणे शेअर्स (PNCPS) व इक्विटी वारंट्स (EW) या स्वरुपात संस्थांच्या नावाने युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.नवी दिल्ली या बँकेत उघडण्यात येणाऱ्या डी-मॅट खात्यामध्ये भागाच्या (शेअर्स)स्वरूपात जमा होणार आहेत. मात्र सध्याच्या तरतुदीनुसार निबंधकाच्या परवानगीशिवाय सहकारी बिगरकृषी पतसंस्थांना डी-मॅट खाते उघडता येत नाही. त्यामुळे या पतसंस्थांच्या पंजाब अँण्ड महाराष्ट्र बँकेत को-ऑप.बँक लि.,मुंबई या बँकेत अडकलेल्या विमा सरंक्षित नसलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी विलीनीकरणानंतर वरील दि.३०/३/२०२२ च्या पत्रान्वये, युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.,या बँकेने संस्थांना डी-मॅट स्वरुपात खाते उघडणे अनिवार्य केलेले आहे.याबाबत युनिटी स्मॉल बँकेने जारी

केलेले वरील वर्गीकरणाप्रमाणे या संस्थांच्या ठेवीची रक्कम भागाच्या(शेअर्स)स्वरुपात रुपांतरीत होणेकरिता डी-मॅट खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबत अनेक संस्थांनी या कार्यालयास विनंती केलेली आहे.

राज्यातील ज्या बिगरकृषी सहकारी पतसंस्थांच्या ठेवीची रक्कम पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑप बँक लि.मुंबई या बँकेत अडकलेली आहे व ज्याचे दायित्व विलिणीकरणानंतर युनिटी स्मॉल फायनान्स लि., या बँकेकडे आहे, अशा बिगरकृषी पतसंस्थांना या परिपत्रकाद्वारे खालील अटीना अधीन राहून युनिटी स्मॉल फायनान्स बँक लि.,नवी दिल्ली या बँकेने जारी केलेल्या वरील वर्गीकरणाप्रमाणे भागाच्या स्वरुपात रुपांतरीत होणेकरिता डी-मॅट (D-Mat)खाते उघडण्यासाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७० मधील तरतुदीनुसार मान्यता देणेत येत आहे.

१) सदर डी-मॅट खाते केवळ या व्यवहारापुरतेच उघडणेबाबत बिगरकृषी पतसंस्थांनी संचालक मंडळाच्या सभेत स्वतंत्र विषयाद्वारे ठराव करुन मान्यता घ्यावी.
२) बिगरकृषी पतसंस्थांनी नियामक मंडळाचे एनपीए तरतूदीबाबतचे दिनांक १/१०/२०२० च्या परिपत्रकानुसार,अनुत्पादक गुंतवणूकीवरील करावयाची तरतूद सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे करावयाची आहे.
३) सदर गुंतवणूक वैधानिक तरलता निधी (SLR) व्यतिरिक्त गुंतवणूक म्हणून संस्थेच्या ताळेबंदात दर्शविणेत यावी. सदर गुंतवणूक वैधानिक तरलता निधी (SLR) साठी पात्र असणार नाही.
४) सदर डी-मॅट खात्यावर या व्यवहाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे होम ट्रेडींगचे व्यवहार बिगरकृषी पतसंस्थांना करता येणार नाहीत.
५) सदर व्यवहाराबाबत संस्थेच्या प्रतिवर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालामध्ये नोंद घेण्यात यावी.
६) सदर प्रकरणी गैरव्यवहार, अनियमितता व आर्थिक नुकसान झालेस संबंधित पतसंस्थेचे संचालक मंडळ पुर्णपणे जबाबदार राहतील.

वरीलप्रमाणे राज्यातील बिगर कृषी पतसंस्थांनी कार्यवाही करावी.

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे**

**प्रति,**

१) विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था (सर्व विभाग ) (प्रशासन/लेखापरीक्षण )
२) जिल्हा उपनिबंधक ,सहकारी संस्था (सर्व जिल्हे )
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक ,सहकारी संस्था (सर्व जिल्हे )
४) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,------------------------------------------------------(सर्व पतसंस्था फेडरेशन) (राज्य/विभाग/जिल्हा /तालुके )
५) अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक /सचिव,-------------------नागरी/ ग्रामीण /पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.,----------------- तालुका ------------ जिल्हा --------
६) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय ,पुणे ( कार्यालय संकेतस्थळावर प्रसिद्धीस्तव)
७) धारिका संग्रही

**प्रत माहितीस्तव**

१. मा. अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), मंत्रालय , मुंबई ३२
२. अध्यक्ष/सचिव,महाराष्ट्र राज्य बिगरकृषी पतसंस्था नियामक मंडळ,पुणे
३. अपर आयुक्त व विशेष निबंधक ,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे